# नवी मानवजात

## ईश्वरी योजना

मानवी इतिहासातील सर्व मोठ्या आपत्कालीन प्रसंगांच्या वेळच्या परिस्थितीप्रमाणे, मानवजात सध्या आध्यात्मिक पुनर्जन्माच्या यातनामय अशा प्रसूतिवेदनांच्या अनुभवातून जात आहे. विक्राळ विध्वंसक शक्ती आ वासून उभ्या असून, चालू क्षणी तरी त्याच प्रभावी वाटत आहेत; परंतु ज्यांच्यामुळे मानवजातीचा उद्धार घडून येईल अशा विधायक व सर्जनशील शक्तीही अनेक माध्यमांद्वारे प्रसृत केल्या जात आहेत. जरी [मानवजातीला] प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या या शक्तींचे कार्य सर्वस्वी शांतपणे चालू आहे, तरी अखेरीस त्या असे विविध प्रकारचे परिवर्तन घडवून आणतील, की ज्यामुळे मानवजातीची पुढील आध्यात्मिक प्रगती सुरक्षिततेने व स्थिर गतीने होईल. [या प्रगतीसाठी] आसुसलेल्या व [विपत्तींनी] गांजून गेलेल्या जगाला चिरंतन व एकमेव दैवी सत्य नव्या स्वरूपात प्रदान करण्याच्या ईश्वरी योजनेचा हा सर्व भाग आहे.

## युद्ध : अधिक भयानक कारणांचे बाह्य लक्षण

सध्या मानवजातीला भेडसावणारी अत्यंत महत्त्वाची अशी समस्या कोणती असेल तर ती म्हणजे जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये सर्व प्रकारची सूक्ष्म व स्थूल रूपे धारण करून वावरणाऱ्या स्पर्धा, संघर्ष व कलह इत्यादींचा समूळ नायनाट करणारे मार्ग व साधने शोधून काढण्याची. साहजिकच लष्करी युद्धे ही अराजक व विध्वंस यांची सर्वात स्वाभाविक साधने आहेत. तथापि, प्रत्यक्ष युद्धे ही काही मानवजातीसमोरील प्रमुख समस्या होऊ शकत नाही, कारण ती त्यांच्या मुळाशी असणाऱ्या अधिक

गंभीर [व भयानक] अशा कोणत्या तरी गोष्टींची प्रगट झालेली बाह्य लक्षणे असतात. युद्धे व त्यांच्याबरोबर येणाऱ्या हालअपेष्टा केवळ युद्धविरोधी प्रचाराने टाळता येणार नाहीत; मानवी इतिहासातून त्यांचे उच्चाटन करावयाचे असेल तर त्यांच्या मुळाशी असलेल्या कारणांना हात घालणे आवश्यक ठरते. जेव्हा लष्करी युद्धे लढली जात नसतात तेव्हासुद्धा काही व्यक्ती किंवा व्यक्तींचे गट आर्थिक किंवा दुसऱ्या कोणत्या तरी सूक्ष्म स्वरूपाच्या लढ्यात सतत गुंतलेले असतात. ही मूलभूत कारणे जेव्हा चिघळून विकोपास जातात तेव्हाच युद्धे, त्यांच्यामध्ये अंतर्भूत असलेल्या सर्व प्रकारच्या क्रौर्यासह उद्भवत असतात.

### युद्धाचे मूलभूत कारण : अहंकार व स्वार्थ

ज्या मूलभूत कारणामुळे अराजकाची परिस्थिती युद्धाचे स्वरूप धारण करते ते म्हणजे बहुसंख्य व्यक्ती या अहंकाराच्या व स्वार्थी हितसंबंधांच्या विळख्यात जखडल्या गेलेल्या असतात, आणि त्या स्वतःचा अहंपणा व स्वार्थी उद्दिष्टे वैयक्तिक पातळीवर तसेच सामुदायिक रीत्या प्रगट करीत असतात. ज्यात माणसे गुरफटून पडतात असे हे भ्रामक मूल्यांचे जीवन होय. सत्याला सामोरे जाणे म्हणजे, जीवन ज्या असंख्य रूपांत प्रगट होते त्या रूपांमध्ये व रूपांद्वारे ते एक आहे, याचा अनुभव घेणे होय. ही जाण निर्माण होणे म्हणजे जीवनाच्या एकत्वाच्या साक्षात्कारात संकुचित अहंकाराची विस्मृती घडून येणे होय.

### युद्धे अनावश्यक व अविचारीपणाची द्योतक

खरा जाणतेपणा निर्माण झाल्यावर युद्धांची समस्या तत्काळ निकालात निघेल. युद्धे ही अनावश्यक व अविचारीपणाची द्योतक दोन्ही आहेत ही गोष्ट इतक्या स्वच्छपणे उमगली पाहिजे की, त्यामुळे युद्धे कशी थांबवावीत ही तातडीची समस्या न बनता, ती [युद्धे] अशा प्रकारच्या भीषण व क्लेशदायक परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या मनोवृत्तीविरुद्ध आध्यात्मिक दृष्ट्या कशी पुकारावीत, ही बनली पाहिजे. समग्र जीवनाच्या एकात्मतेच्या प्रकाशात सहकार्यावर आधारलेला व सुसंवादी मानवी व्यवहार हा स्वाभाविक व अनिवार्य ठरतो. त्यामुळे, मानवजातीची नवीन पायावर पुनर्रचना करण्याची ज्यांना तीव्र तळमळ लागून राहिलेली आहे त्यांच्यासमोरील प्रमुख कार्य म्हणजे, मानवजात ज्या आध्यात्मिक अज्ञानात गुरफटून

पडलेली आहे ते अज्ञान दूर करण्यासाठी त्यांनी आपली कंबर कसणे, हे होय.

## जीवनाच्या सर्व क्षेत्रांतून स्वार्थी वृत्तीचे उच्चाटन आवश्यक

युद्धे ही केवळ ऐहिक सुसंवाद घडवून आणण्यासाठी उद्भवत नाहीत; अविवेकीपणाने स्वार्थी, संकुचित हितसंबंधांशी एकरूपतेचे जे नाते जोडले जाते त्याचीच ती अनेकदा अपत्ये असतात. या हितसंबंधांशी संपर्क ठेवल्यामुळे, ''माझे'' या वर्गात जीवनाचे जे क्षेत्र मोडते, त्यात त्यांचा समावेश होतो. ऐहिक सुसंवाद हा आध्यात्मिक सुसंवाद स्थापन करण्याच्या अधिक विशाल अशा समस्येचा केवळ एक भाग होय. आध्यात्मिक सुसंवादासाठी अहंकाराचे उच्चाटन जीवनाच्या नुसत्या भौतिक क्षेत्रांतून होऊन चालत नाही, तर मानवी जीवनाच्या बौद्धिक, भावनिक व सांस्कृतिक जीवनावर प्रभाव गाजविणाऱ्या क्षेत्रांतूनही ते होणे आवश्यक असते.

## ऐहिक सुसंवादासाठी आध्यात्मिक जाणतेपणा आवश्यक

मानवजातीपुढील समस्या ही केवळ भाजी - भाकरीची समस्या आहे अशी समजूत करून घेणे म्हणजे मानवतेला पशुत्वाच्या पातळीवर आणून बसविण्यासारखे आहे. आणि जरी मानवाने शुद्ध भौतिक सुसंवाद साधण्याचे मर्यादित उद्दिष्ट आपल्यासमोर ठेवले, तरी त्याच्या ठिकाणी आध्यात्मिक जाणतेपणा असेल तरच त्याला त्या प्रयत्नात यश मिळू शकेल. स्वार्थी हितसंबंधांनी आत्म-समर्पित प्रेमाला वाट करून दिल्याशिवाय आर्थिक प्रश्नांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा योजनाबद्ध व सहकारयुक्त व्यवहार घडून येऊ शकणार नाही, या गोष्टीची लोकांना उमज पडेपर्यंत आर्थिक सुसंवाद साधणे अशक्य आहे. नाहीतर, भौतिक क्षेत्रात सर्वोत्तम साधनसामग्री तसेच कार्यक्षमता जवळ असूनही मानवजात संघर्ष व अतृप्ती टाळू शकणार नाही.

## विज्ञानाची हक्काची जागा

सध्याचे संघर्ष व हालअपेष्टा यांच्या प्रसूतिवेदनांतून जी ***नवी मानवजात*** जन्माला येईल ती विज्ञानाची किंवा त्याने केलेल्या वास्तवातील कार्यांची उपेक्षा करणार नाही. विज्ञानाकडे अध्यात्मविरोधी म्हणून पाहणे चुकीचे आहे. विज्ञान अध्यात्माला पोषक आहे की बाधक हे, ते ज्या पद्धतीने उपयोगात आणले जाते

त्यावरून ठरत असते. ज्याप्रमाणे जातिवंत कला आध्यात्मिकतेचा प्रगट आविष्कार घडविते त्याप्रमाणे विज्ञानही, जर ते योग्य पद्धतीने हाताळले, तर आत्म्याच्या अभिव्यक्तीचे व परिपूर्तीचे साधन बनू शकते. शरीर व त्याचे या स्थूल जगतातील जीवन यासंबंधीचे विज्ञानाचे वास्तव नियम आत्म्याच्या दृष्टीने त्याच्या स्वतःच्या साक्षात्काराची माध्यमे बनू शकतात; परंतु हा हेतू साध्य होण्यासाठी त्यांची अधिक विशाल अशा आध्यात्मिक जाणतेपणामध्ये योग्य प्रकारे योजना केली पाहिजे. त्यासाठी सत्य व चिरंतन मूल्यांचे सतत भान राखणे अपेक्षित असते. अशा प्रकारच्या आध्यात्मिक प्रगल्भतेचा जर अभाव असेल तर वैज्ञानिक सत्ये व विज्ञानाने साध्य केलेल्या गोष्टी यांचा उपयोग परस्परांच्या विध्वंसासाठी व आत्म्याला जखडून टाकणारी बंधने अधिक बळकट करण्याकडे कल असलेल्या जीवनासाठी केला जाण्याची दाट शक्यता आहे. विज्ञान व अध्यात्म या दोहोंनी हातात हात घालून वाटचाल केली तरच मानवाची सर्वांगीण प्रगती खात्रीपूर्वक होऊ शकेल.

**आध्यात्मिक अनुभवाची गरज**

शुष्क, कोरड्या बौद्धिक तत्त्वांनी नव्हे, तर जिवंत आध्यात्मिक अनुभवाने ***नव्या मानवजातीच्या*** आगामी संस्कृतीमध्ये चैतन्य ओतले जाईल. अंतर्यामी अधिक खोलवर असणाऱ्या ज्या सत्य-तत्त्वांपर्यंत केवळ बुद्धीची झेप पोहोचू शकत नाही, त्या सत्य - तत्त्वांवर आध्यात्मिक अनुभवाची सत्ता चालत असते; हा आध्यात्मिक अनुभव आणखी कशाच्या तरी मदतीविना, एकट्या बुद्धीच्या जोरावर घेता येऊ शकत नाही. आध्यात्मिक सत्य हे अनेकदा बुद्धीच्या द्वारे सांगितले व प्रसृत केले जाऊ शकते; तसेच आध्यात्मिक अनुभवाची वैचारिक देवाणघेवाण करण्याच्या बाबतीतही बुद्धीचे काही प्रमाणात साहाय्य होऊ शकते. मात्र आध्यात्मिक अनुभव घेण्यासाठी माणसाला समर्थ बनविण्याच्या बाबतीत किंवा त्या अनुभवात इतरांना सहभागी करून घेण्याच्या बाबतीत निव्वळ बुद्धी ही तोकडी पडते. जर दोन व्यक्तींना डोकेदुखीचा त्रास होत असेल तर त्या दोन्ही एकमेकांच्या सहकार्याने [संयुक्तपणे] डोकेदुखीच्या आपल्या अनुभवांची चिकित्सा करून विचारांच्या द्वारे त्यांचे स्पष्टीकरण आपल्यापुरते करून घेऊ शकतात. पण जर का एखाद्या व्यक्तीने डोकेदुखीचा अनुभव कधीच घेतला नसेल, तर डोकेदुखी काय असते हे तिला समजावून देण्याच्या बाबतीत कितीही बौद्धिक स्पष्टीकरणे दिली तरी ती उणीच पडतील.

बौद्धिक स्पष्टीकरण हा केव्हाही आध्यात्मिक अनुभवाला पर्याय ठरू शकत नाही; जास्तीत जास्त म्हणजे ते त्याची पायाभरणी करणारी पूर्वतयारी करू शकते.

### आध्यात्मिक अनुभवाचे स्वरूप व महत्त्व

आध्यात्मिक अनुभवामध्ये, केवळ बुद्धीने जेवढे काही आकलन होते त्यापेक्षा अधिक काहीतरी अंतर्भूत असते. बऱ्याच वेळा ही गोष्ट पक्केपणाने ठसविण्याकरिता त्या [आध्यात्मिक] अनुभवाला गूढ अनुभव असे म्हणण्यात येते. गूढवाद म्हणजे बुद्धिवादाच्या विरोधी, संदिग्ध, विचारांचा गोंधळ असलेले किंवा अव्यवहार्य व वास्तवाशी संबंध नसलेले असे काहीतरी आहे, असे बहुधा समजले जाते. वास्तविकपणे खरा गूढवाद यांपैकी काहीही नाही. खरा गूढवाद जेव्हा ईश्वरी सत्याचे दृश्य - स्वरूप असतो – आणि तसा तो असलाही पाहिजे – तेव्हा त्याच्यात तर्कविसंगत असे काहीही नसते. ती एक अशा प्रकारची आकलनशक्ती आहे की जी पूर्णतया निःसंदिग्ध असते; शिवाय ती इतकी व्यवहार्य आहे, की जीवनाच्या प्रत्येक क्षणी ती जगता येऊ शकते, तसेच दैनंदिन कर्तव्यांतून व्यक्तही करता येऊ शकते. अनुभवाशी तर तिचा इतका दृढ संबंध आहे की, एका दृष्टीने पाहिल्यास, तिला सर्व अनुभवांचे अंतिम आकलन असे म्हणता येईल.

जेव्हा आध्यात्मिक अनुभवाचे गूढ म्हणून वर्णन केले जाते तेव्हा आपण अशी समजूत करून घेऊ नये की तो अनुभव म्हणजे निसर्गनियमातीत व मानवी जाणिवेच्या आवाक्याच्या सर्वस्वी पलीकडचा असा काहीतरी आहे. या सर्वांचा अर्थ एवढाच आहे की जोपर्यंत बुद्धी ही स्वतःच्या मर्यादा ओलांडून पलीकडे जात नाही व अमर्याद परमात्म-तत्त्वाच्या साक्षात अनुभवाने प्रकाशित होत नाही, तोपर्यंत तो [आध्यात्मिक अनुभव] तिच्या आवाक्याबाहेर राहतो. येशू ख्रिस्त जेव्हा म्हणाला, '' सर्व सोडून द्या व माझ्या मागे या,'' तेव्हा त्याने आध्यात्मिक अनुभवाचा मार्गच दाखवून दिला. याचा अर्थ असा की मानवाने आपल्या मर्यादा झुगारून देऊन स्वतःला ईश्वराच्या अमर्याद जीवनात स्थापन केले पाहिजे. आध्यात्मिक अनुभवामध्ये, जाणिवेच्या उच्चतर भूमिका पार करत पुढे जात असताना होणाऱ्या आत्म्याच्या स्वरूपाच्या ज्ञानाचाच केवळ नव्हे, तर ऐहिक कर्तव्यांकडे पाहण्याच्या योग्य अशा दृष्टिकोनाचाही समावेश होतो. जर त्याचा [आध्यात्मिक अनुभवाचा] जीवनाच्या विविध अंगांशी असलेला संबंध तुटला तर आपल्या हाती उरते ती फक्त बुद्धिभ्रंशाची प्रतिक्रिया, जी आध्यात्मिक अनुभव असण्यापासून फार दूर असते.

## पलायनवादी मनोवृत्तीतून आध्यात्मिक अनुभवाची प्राप्ती नाही

जो आध्यात्मिक अनुभव ***नव्या मानवजातीचे*** पुनरुज्जीवन करून तिला चैतन्यमय बनविणार आहे, तो जीवनातील वास्तवांमुळे करणे भाग पडणाऱ्या कठोर व अनिवार्य अशा कर्तव्यांची केवळ एक प्रतिक्रिया असू शकत नाही. ज्यांच्याजवळ जीवनप्रवाहाशी जुळवून घेण्याची क्षमता नसते त्यांच्या ठिकाणी जीवनातील वास्तवांपासून माघार घेण्याची व आपणच निर्माण केलेल्या भ्रामक कल्पनांच्या किल्ल्यांचा आश्रय व संरक्षण घेण्याची प्रवृत्ती असते. अशा प्रकारची प्रतिक्रिया म्हणजे, जीवनातील अनिवार्य असलेल्या कर्तव्यांपासून स्वतःच्या वेगळेपणाच्या अस्तित्वाचे रक्षण करून त्याला कायमचे स्वरूप देण्याचा प्रयत्न होय. त्यामुळे सुरक्षितपणाची व आत्म - परिपूर्णतेची खोटी भावना निर्माण होऊन, जीवनातील समस्यांची सोडवणूक केल्याचा आभास मात्र निर्माण होऊ शकतो. तो [प्रयत्न] म्हणजे खऱ्या व चिरस्थायी सोडवणुकीच्या दिशेने केलली प्रगतीही नसते, उलट खऱ्या आध्यात्मिक मार्गापासून बाजूला फेकले जाण्याचा तो प्रकार होय. त्यामुळे मानव हा वारंवार जीवनाच्या नवनवीन व अनियंत्रित लाटांनी स्वतःच्या भ्रामक आश्रयस्थळांपासून वरचेवर स्थानभ्रष्ट केला जाईल, आणि पलायनवादी वृत्तीच्या द्वारे आपल्या वेगळेपणाच्या अस्तित्वाचे रक्षण करण्याचे उद्दिष्ट साध्य करू पाहण्याने नवीन प्रकारच्या यातना स्वतःवर ओढवून घेईल.

## नवी मानवजात बाह्य साकार रूपांना चिकटून राहणारी नसेल

ज्याप्रमाणे माणूस आपल्या वेगळेपणाच्या अस्तित्वाला पलायनवादी वृत्तीच्या द्वारे चिकटून राहू पाहतो, त्याप्रमाणे त्या अस्तित्वाला कधी कधी तो विविध साकार रूपे, समारंभ, विधी, परंपरा व रूढी यांच्याशी अविवेकीपणाने एकरूप होऊनही चिकटून राहावयास पाहत असतो. साकार रूपे, विधी व समारंभ, परंपरा व रूढी या गोष्टी बहुतेक बाबतीत अमर्याद जीवनाला प्रगट होऊ देण्यात अडसर ठरतात. जर या सर्व गोष्टी अमर्याद जीवनाच्या अभिव्यक्तीची लवचिक माध्यमे बनल्या असत्या, तर त्या या भूतलावर दैवी जीवनाची परिपूर्ती घडवून आणण्यात अडसर न ठरता उपयुक्त साधने ठरल्या असत्या. परंतु त्या ज्या जीवनाची अभिव्यक्ती करत असतात त्या जीवनापासून अलग राहून स्वतःच्या [खास] अधिकाराच्या जोरावर प्रतिष्ठा व हक्क पदरात पाडून घेण्याकडे बहुतांशी त्यांचा [विधी, परंपरा इत्यादींचा] कल

असतो. जेव्हा असे घडते तेव्हा त्यांच्याविषयीच्या कोणत्याही प्रकारच्या आसक्तीची परिणती सरतेशेवटी जीवनाच्या आत्यंतिक संकुचितपणात व बंधनकारकतेत होणे अपरिहार्यच ठरते. ***नवी मानवजात*** बंधनांनी जखडलेल्या जीवनापासून मुक्त केली जाईल आणि मग ती आत्म्याच्या सर्जनशील जीवनाला अनिर्बंधपणे वाव करून देईल; त्याचप्रमाणे बाह्य साकार रूपांविषयीच्या आसक्तीचे निर्मूलन करून, त्यांना आत्म्याच्या सत्तेखाली दुय्यम स्थान देण्यास ती शिकेल. मायेतील भ्रामक व खोट्या मूल्यांवर आधारलेल्या मर्यादित जीवनाची जागा दैवी सत्यावर अधिष्ठित झालेले अमर्याद जीवन घेईल; आणि ज्या बंधनांच्या जोरावर स्वतःच्या वेगळेपणाच्या अस्तित्वाचा सवता सुभा निर्माण करणारा अहंकार पोसला जातो, ती बंधने, त्यांना खऱ्या आध्यात्मिक जाणतेपणाचा स्पर्श होताक्षणीच विरघळून जातील.

## संकुचित गटाशी तादात्म्य : मर्यादित अहंकाराचे एक स्वरूप

ज्याप्रमाणे माणूस स्वतःचे वेगळे अस्तित्व पलायनवादी वृत्तीच्या आश्रयाने वा बाह्य साकार रूपांशी एकजीव होऊन टिकवून धरू पाहतो, त्याप्रमाणेच हे वेगळे अस्तित्व तो एखादा वर्ग, संप्रदाय, पंथ किंवा धर्म, किंवा लिंगभेदावर आधारलेली विभागणी यांच्याशीही तादात्म्य पावून टिकवून धरू पाहत असतो. या बाबतीत माणूस अधिक विशाल अशा गटाशी एकरूप झालेला असल्याने, त्याने आपले [संकुचित] वेगळेपणाचे अस्तित्व गमावल्याचा आभास निर्माण होतो. परंतु वास्तविक पाहता अशा एकरूपतेच्या द्वारे तो बऱ्याच वेळा आपले वेगळे अस्तित्वच अशा तऱ्हेने प्रगट करत असतो की ज्यामुळे, दुसऱ्या वर्गातील, राष्ट्रांतील, संप्रदायांतील, पंथांतील, धर्मांतील किंवा लिंगातील ज्या इतर व्यक्ती आहेत, त्यांच्यापासून आपण निराळे असल्याच्या स्वतःच्या भावनेचा आनंद लुटणे त्याला शक्य होते.

## संकुचित अहंकाराचे विरोधी द्वंद्वांवर जगणे

विभाजनवादी [वेगळेपणाचे] अस्तित्व हे विरोधी द्वंद्वांपैकी एकाशी पूर्णपणे जुळवून घेऊन तर दुसऱ्याशी फारकत घेऊन स्वतःचा 'मी'पणा व स्वतःचे बळ यांना प्राप्त करून घेत असते. एखादी व्यक्ती स्वतःच्या विभाजनवादी अस्तित्वाची जपणूक, एका तात्त्विक विचारप्रणालीऐवजी दुसरीशी एकरूप होऊन, किंवा वाईटपणाबद्दलच्या स्वतःच्या समजुतीविरुद्ध चांगलेपणाबद्दलच्या स्वतःच्या समजुतीशी एकरूप होऊन

करू पाहते. संकुचित गटांशी किंवा ध्येयाशी एकरूपता पावल्यामुळे घडून येणारा परिणाम म्हणजे विभाजनवादी अहंकाराचे खरेखुरे विलीनीकरण नव्हे, तर त्याचा केवळ आभास होय. संकुचित अहंकाराचे वैश्विक जीवनाच्या महासागरात खरेखुरे विलीनीकरण घडवून आणण्यामध्ये विभाजनवादी अस्तित्वाचे त्याच्या सर्व प्रकारच्या रूपांसह समर्पण करणे अभिप्रेत आहे.

**भविष्याच्या दृष्टीने आशेचा किरण**

मानवसमाजातील बहुतेक माणसे ही वेगळेपणाच्या व आक्रमक प्रवृत्तीच्या पंजात अडकून पडलेली असतात. मानवजात बंधनात जखडून पडल्याची ही वस्तुस्थिती पाहून ज्याच्या भावना अनावर होतात त्याच्या दृष्टीने, मानवजातीच्या भविष्यात न संपणाऱ्या निराशेशिवाय दुसरे काहीही असू शकणार नाही. मानवजातीच्या सध्याच्या यातनांबद्दल आपल्याला जर अचूक दृष्टिकोन प्राप्त करून घ्यावयाचा असेल तर आपण चालू काळातील वस्तुस्थितीचा अधिक खोलात जाऊन विचार करणे अत्यावश्यक आहे. जे जागतिक परिस्थितीचा उथळपणे विचार करतात त्यांच्या बाबतीत ***नवी मानवजात*** प्रत्यक्षात येण्याबाबतच्या शक्यता त्यांच्या नजरेआड होतात; मात्र त्या [शक्यता] अस्तित्वात असून, पूर्ण कार्यान्वित होण्यासाठी व प्रभावी ठरण्यासाठी त्यांना फक्त आध्यात्मिक जाणतेपणाच्या स्फुल्लिंगाचीच काय ती गरज आहे. कामवासना, द्वेष व लोभ यांच्या शक्ती असंख्य यातना व गोंधळाची परिस्थिती निर्माण करतात. तथापि मानवी स्वभावाचे एक आशादायक वैशिष्ट्य म्हणजे, अगदी विध्वंसक शक्तींनी घेरलेले असतानाही, कोणत्या तरी स्वरूपाचे प्रेम निरपवादपणे त्याच्या [स्वभावाच्या] ठिकाणी टिकून असल्याचे आढळून येते.

**प्रेम बंधनमुक्त असले पाहिजे**

अगदी युद्धांनासुद्धा सहकार्याने कार्य करण्याची आवश्यकता भासते; मात्र एका विशिष्ट गटाशी वा ध्येयाशी झालेल्या एकरूपतेमुळे या सहकारी कार्याला कृत्रिम मर्यादा पडतात. युद्धे ही बऱ्याच वेळा एक प्रकारच्या प्रेमातूनच लढली जात असतात – मात्र असे प्रेम की ज्याचे स्वरूप नीट समजून घेण्यात आलेले नाही. प्रेमाला जर आपल्या खऱ्या स्वरूपात प्रगट होण्यास वाव द्यायचा असेल तर ते अनिर्बंध व अमर्याद असले पाहिजे. प्रेम हे तसे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत अस्तित्वात

असते; पण एक तर ते सुप्त असते, किंवा वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, वांशिक दुरभिमान, संकुचित निष्ठा व शत्रुत्वाची भावना यांच्यामुळे, तसेच लिंग, देशाभिमान, पंथ किंवा धर्म इत्यादिकांविषयीच्या आसक्तीमुळे मर्यादित व दूषित झालेले असते. जर मानवजातीचे पुनरुत्थान घडवून आणावयाचे असेल तर मानवाच्या अंतःकरणाची कवाडे सताड उघडी करावी लागतील, ज्यामुळे त्यात एका नव्या जातीच्या प्रेमाचा जन्म होईल – असे प्रेम की ज्याला कोणत्याही प्रकारचा भ्रष्टपणा ठाऊक नाही व जे वैयक्तिक किंवा सामूहिक लोभमोहांपासून पूर्णपणे मुक्त आहे.

## प्रेम स्वयंप्रसारी असते

***नवी मानवजात*** ही उदंडपणे प्रसृत केल्या गेलेल्या प्रेमाद्वारे प्रत्यक्षात येईल, आणि हा प्रेम-प्रसार सद्गुरूंनी घडवून आणलेल्या आध्यात्मिक जागृतीतून होऊ शकेल. केवळ दृढनिश्चयातून प्रेम उत्पन्न होऊ शकत नाही; फार तर अशा कसरतीमुळे मनुष्य जास्तीत जास्त कर्तव्यदक्ष बनू शकेल. संघर्ष व प्रयत्न यांच्या द्वारे, आपल्या सदसद्विवेकबुद्धीला जे योग्य वाटते त्याच्याशी आपली बाह्य वर्तणूक कशी सुसंगत आहे हे खात्रीपूर्वक पटविण्यात मनुष्य यशस्वी होऊ शकेल; पण अशी वर्तणूक आध्यात्मिक दृष्ट्या निरर्थक असते, कारण तिच्यात आंतरिक उत्स्फूर्त प्रेमाच्या सौंदर्याची उणीव असते. प्रेम हे अंतरंगातून उत्स्फूर्तपणे उफाळून बाहेर आले पाहिजे; ते कोणत्याही प्रकारच्या आंतरिक किंवा बाह्य दडपणाला भीक घालणारे नसते. प्रेम व बळजबरी या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकत नाहीत. जरी कोणावरही प्रेमाची बळजबरी करता येत नाही, तरी प्रत्यक्ष प्रेमाद्वारेच ते जागृत करता येते; प्रेम हे मूलतः स्वयं-प्रसारी माध्यम असते; त्यामुळे ज्यांच्याजवळ ते नाही असे लोक, ज्यांच्याजवळ ते आहे अशांकडून त्याला प्राप्त करून घेऊ शकतात. ज्यांना इतरांकडून प्रेमाचा लाभ होतो ते प्रतिसाद दिल्याशिवाय त्या प्रेमाचा स्वीकार करू शकत नाहीत – असा प्रतिसाद की जो स्वतःदेखील प्रेमाचेच स्वाभाविक रूप असतो. खरे प्रेम हे अजिंक्य व प्रतिकारातीत असते. ते आपले सामर्थ्य येथपर्यंत वाढवीत राहते व स्वतःचा प्रसार येथपर्यंत करीत राहते की अखेरीस, ज्याला ज्याला ते स्पर्श करते त्या प्रत्येकाचे ते परिवर्तन घडवून आणते. एका अंतःकरणाद्वारे दुसऱ्या अंतःकरणात याप्रमाणे प्रसार पावत जाणाऱ्या शुद्ध प्रेमाच्या मुक्त व अनिर्बंध आंतरिक व्यवहाराद्वारे मानवजात अस्तित्वाची व जीवन जगण्याची एक नवी पद्धत हस्तगत करेल.

## दैवी प्रेमाद्वारे मानवजातीचे पुनरुज्जीवन

ज्याच्यामध्ये प्रत्येकाचा व प्रत्येक गोष्टीचा निरपवादपणे समावेश होतो, त्या वैश्विक दैवी जीवनाच्या अधिकारापेक्षा दुसरे कोणतेही अधिकार श्रेष्ठतर नाहीत, याचा जेव्हा [ मानवजातीला ] पक्केपणी उमज पडेल, तेव्हा दैवी प्रेम केवळ सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत शांती, सुसंवाद व सौख्य यांची स्थापना करून थांबणार नाही, तर ते आत्म-पावित्र्याच्या व आत्म-सौंदर्याच्या जोरावर प्रकाशमान होऊ लागेल. दैवी प्रेम हे द्वंद्वात्मक मायासृष्टीच्या भीषण हल्ल्यांना अभेद्य ठरणारे असून, ते स्वतः ईश्वरत्वाचे प्रगटीकरण आहे. दैवी प्रेम ही अशी गोष्ट आहे, की जिच्या द्वारे ***नव्या मानवजातीचा*** सूर ईश्वरी योजनेशी जुळून येईल. दैवी प्रेम हे केवळ वैयक्तिक जीवनातच अविनाशी माधुर्य व असीम आनंद निर्माण करेल असे नाही, तर ***नव्या मानवजातीच्या*** एका नवयुगाची शक्यताही ते प्रत्यक्षात उतरवेल. दैवी प्रेमाच्या माध्यमातून ***नवी मानवजात*** सहकार्याचे व सुसंवादाचे जीवन जगण्याची कला शिकून घेईल; मायासृष्टीच्या निर्माल्यवत् झालेल्या विविध साकार रूपांच्या भयंकर दडपणातून ती स्वतःला मुक्त करून घेईल आणि आध्यात्मिक जाणतेपणावर आधारलेल्या सर्जनशील जीवनाला वाट मोकळी करून देईल; मायेच्या जगतातील सर्व भ्रामक गोष्टी ती झटकून फेकून देईल व ईश्वरी सत्यामध्ये स्थिरतेने प्रस्थापित होईल; ती शांतीचा व अखंड सौख्याचा आस्वाद घेईल; चिरंतनतेच्या जीवनात तिला प्रवेश दिला जाईल.

✤✤